• गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६
• वर्ष : ०३ • अंक : १५४
• पुणे
• पाने ४
• किंमत : २ रूपये

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
•RNI No.-MAHMAR/2023/89313




विजेसारखी तलवार चालवुन गेला,
निधड्या छातीने हिंदुस्तान हालवुन गेला,
मुठभर मावळे घेऊन हजारो सैतानांना नडुन गेला..!

शिवजयंती

# विश्वचषकात टीम इंडियाचा तांडव

## लिंबू टिंबू नेदरलँडसनं झुंजवलं, शेवटच्या षटकात विजय; आता सुपर-८ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे आव्हान

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
सूर्यकुमार यादवच्या कल्पक नेतृत्वाखाली भारतीय संघाने आपला विजयी रथ कायम राखला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात भारताने नेदरलँड्सचा 17 धावांनी पराभव केला. या विजयासह टीम इंडियाने साखळी फेरीत 4 पैकी 4 सामने जिंकून आपली अपराजित मोहीम दिमाखात सुरू ठेवली आहे.

या सामन्यात भारतीय संघाकडून सलामीला अभिषेक शर्मा आणि ईशान किशन मैदानात उतरले. मात्र अभिषेक पुन्हा एकदा दुर्दैवी ठरला. सामन्याच्या पहिल्याच षटकात नेदरलँड्सच्या गोलंदाजाच्या चेंडूवर तो शून्यावर बाद झाला. त्याने अवघ्या 3 चेंडूचा सामना केला आणि या विश्वचषकात त्याची शून्यावर बाद होण्याची हॅट्ट्रिकच पूर्ण झाली. यानंतर ईशान किशनने आक्रमक सुरुवात करत 18 धावा झटपट केल्या, पण तोही जास्त वेळ टिकू शकला नाही. त्याच्या बाद झाल्यानंतर




भारताची अवस्था 39/2 अशी झाली.

एका टप्प्यावर तिलक वर्मा (31) आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी डाव सावरला. मात्र नेदरलँड्सच्या क्षेत्ररक्षकाने अप्रतिम कॅच घेत तिलकला माघारी धाडले. त्यानंतर सूर्यकुमारही 28 चेंडूत 34 धावा करून बाद झाला आणि भारताचा स्कोअर 110/4 असा झाला.

### आता सुपर-८ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे आव्हान

**साखळी फेरीत अपराजित राहिल्यानंतर आता भारतीय संघ सुपर-8 फेरीसाठी सज्ज झाला आहे. भारताचा पुढचा मोठा सामना 22 फेब्रुवारीला बलाढ्य दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. विशेष म्हणजे हा हाय-व्होल्टेज सामना देखील अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवरच खेळवला जाणार असून, संपूर्ण देशाचे लक्ष आता या लढतीकडे लागले आहे.**

शेवटच्या षटकांत शिवम दुबे आणि हार्दिक पांड्या यांनी तुफानी फटकेबाजी करत संघाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. एका क्षणी भारत 200 धावांचा टप्पा सहज पार करेल असे वाटत होते. दुबेने 31 चेंडूत 4 चौकार आणि 6 षटकारांसह 66 धावांची झंझावाती खेळी केली, तर हार्दिकने 21 चेंडूत 30 धावा जोडल्या. मात्र अखेरच्या षटकात दोघेही बाद झाल्याने भारताला 200 धावांचा आकडा गाठता आला नाही. नेदरलँड्सकडून गोलंदाजाने 3 बळी घेत प्रभावी कामगिरी केली आणि भारतीय डावाला आळा घातला.

194 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लिंबू-टंबू समजल्या जाणाऱ्या नेदरलँड्सने सर्वांनाच चकित केले. सलामीपासूनच त्यांनी भारतीय गोलंदाजांचा धैर्याने सामना केला. नेदरलँड्सच्या फलंदाजांनी खेळाच्या प्रत्येक षटकात धावगती राखण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे सामना शेवटच्या षटकापर्यंत लांबला. नेदरलँड्सने 20 षटकांत 7 गडी गमावून 176 धावा केल्या. भारताकडून वरुण चक्रवर्तीने तीन, शिवम दुबेने दोन, जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान; महाराष्ट्रात राजकीय समीकरणे तापली

- **शरद पवारांसह दिग्गजांची मुदत संपणार**
- **पार्थ पवारांच्या नावाची चर्चा**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
देशातील १० राज्यांतील राज्यसभेच्या ३७ रिक्त होणाऱ्या जागांसाठी भारतीय निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केली असून महाराष्ट्रातील ७ जागांसाठी १६ मार्च २०२६ रोजी मतदान होणार आहे. एप्रिलमध्ये अनेक दिग्गज सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याने ही निवडणूक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च असून ६ मार्चला छाननी होणार आहे. ९ मार्चपर्यंत अर्ज



मागे घेण्याची मुदत देण्यात आली आहे. मतदान १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ दरम्यान होईल, तर त्याच दिवशी सायंकाळी ५ पासून मतमोजणी होऊन निकाल जाहीर केले जाणार आहेत.

राज्य विधानसभेची प्रभावी सदस्यसंख्या २८६ असून एका उमेदवाराला निवडून येण्यासाठी ३७ आमदारांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीकडे भाजपचे १३१, शिंदेसेनेचे ५७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ४० असे मिळून २२८ आमदार आहेत. अपक्ष आणि लहान पक्षांच्या पाठिंब्याने हे संख्याबळ २३५ पर्यंत जाते. त्यामुळे महायुतीचे किमान सहा उमेदवार सहज निवडून येऊ शकतात, असे चित्र आहे.

राजकीय चर्चेनुसार भाजप चार जागा लढवू शकते, तर शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांना प्रत्येकी एक जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून पार्थ पवार यांना राज्यसभेसाठी उमेदवारी देण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत

### महाराष्ट्रातून निवृत्त होणारे सदस्य

**महाराष्ट्राच्या कोट्यातील खालील सात खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिल २०२६ रोजी संपणार आहे – शरद पवार, डॉ. भागवत कराड, रामदास आठवले, प्रियंका चतुर्वेदी, रजनी पाटील, डॉ. फौजिया खान आणि धैर्यशील पाटील.**

आहे. अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी अर्ज प्रक्रियेपूर्वी राजकीय हालचालींना वेग येण्याची चिन्हे आहेत.

विरोधी महाविकास आघाडीचे संख्याबळ मर्यादित आहे. शरद पवार गट, काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट मिळून सुमारे ४६ आमदार आहेत. इतर छोट्या पक्षांचा पाठिंबा मिळून एक जागा निश्चित जिंकता येऊ शकते; मात्र दुसरी जागा मिळवणे कठीण मानले जात आहे. त्यामुळे मविआकडून एका जागेसाठी समन्वय साधणे निर्णायक ठरणार आहे.

इतर राज्यांमध्येही निवडणूक : महाराष्ट्रासह ओडिशा (३), तामिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) या राज्यांमध्येही राज्यसभेच्या निवडणुका होणार आहेत. पुढील काही दिवसांत उमेदवारी अर्ज प्रक्रियेला सुरुवात होताच राज्यातील राजकीय घडामोडींना वेग येणार असून महायुती आणि मविआ कोणाला उमेदवारी देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिवजयंतीला हुल्लडबाजी नको

**(दै. आरंभ पर्व)**
छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती म्हणजे केवळ उत्सव नाही, तर ती स्वाभिमान, शौर्य, संघटन आणि संस्कारांची आठवण करून देणारा पवित्र दिवस आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात शिवजयंतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु गेल्या काही वर्षांत या पवित्र उत्सवाला काही ठिकाणी हुल्लडबाजी, गोंधळ, ध्वनीप्रदूषण आणि अतिरेकाचा रंग चढताना दिसतो. ही बाब चिंताजनक आहे.

शिवाजी महाराजांनी आयुष्यभर शिस्त, संयम, लोककल्याण आणि न्याय यांना प्राधान्य दिले. त्यांनी स्त्रियांचा सन्मान, धर्मनिरपेक्षता, स्वराज्य आणि प्रजेच्या सुरक्षिततेसाठी लढा दिला. त्यांच्या नावाने साजऱ्या होणाऱ्या उत्सवात जर गोंधळ, दारूचे सेवन, बेफाम नाचगाणी आणि इतरांना त्रास देणाऱ्या कृती होत असतील, तर ते महाराजांच्या विचारांना आणि आदर्शांना विरोधी ठरते. शिवजयंती साजरी करताना ढोल-ताशे, मिरवणुका आणि सांस्कृतिक कार्यक्रम हे परंपरेचा भाग आहेत. मात्र त्यात संयम, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूक अडवणे, मोठ्या आवाजात डीजे वाजवून रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना त्रास देणे, ही कृती उत्सवाचे सौंदर्य कमी करते. शिवाजी महाराजांचे नाव घेऊन समाजाला त्रास देणे ही त्यांची खरी शिकवण नाही. आजच्या



शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

**“शिवजयंतीला हुल्लडबाजी नको, तर विचारांची आणि संस्कारांची मिरवणूक हवी,” हा संदेश प्रत्येक तरुणापर्यंत पोहोचला पाहिजे. महाराजांचे नाव घेताना त्यांचे आदर्श आचरणात आणणे हीच खरी शिवभक्ती ठरेल.**

पिढीने शिवजयंतीचा अर्थ फक्त मिरवणूक किंवा देखावा इतकाच ठेवू नये. त्या दिवशी महाराजांचे विचार जाणून घेणे, त्यांच्या किल्ल्यांचे संवर्धन, रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, व्याख्याने, शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा अशा उपक्रमांद्वारे समाजोपयोगी कार्य करणे अधिक महत्त्वाचे आहे. अशा कृतीतूनच खऱ्या अर्थाने शिवरायांना अभिवादन होईल. शिवाजी महाराज हे केवळ एका समाजाचे किंवा प्रदेशाचे नाहीत, तर संपूर्ण राष्ट्राचे प्रेरणास्थान आहेत. त्यांची जयंती हा अभिमानाचा आणि प्रेरणेचा दिवस आहे. त्यामुळे या दिवशी शिस्त, आदर आणि जबाबदारी जपणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

# पाण्याच्या थकबाकी प्रश्नासंबंधी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविणार

- **महापालिका व जलसंपदा विभागांतील पाणी प्रश्नावरील तिढा सोडविण्यासाठी सुळे साधणार मुख्यमंत्र्यांशी संवाद**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
'महापालिका व जलसंपदा हे दोन्हीही राज्य सरकारचेच विभाग आहेत. पाणी बिलाच्या थकबाकीवरून दोन्ही विभागांमध्ये अंतर पडले असून ते अयोग्य आहे. महापालिका आयुक्त व जलसंपदा विभागाशी बोलणे झाले आहे.

याबरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत मी पत्र पाठविणार आहे. दोन्ही विभागांनी आपापसात लढण्यापेक्षा एकत्र येऊन मार्ग काढला पाहीजे.' असे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी सांगितले.

बारामती लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित कामांसह पुणे शहर व समाविष्ट गावांमधील प्रश्नांबाबत सुळे यांनी मंगळवारी महापालिका आयुक्त कार्यालयात आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेऊन प्रलंबित कामांचा आढावा घेतला. त्यानंतर सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला.



सुळे म्हणाल्या, 'महापालिकेतील काही कामे खूप वर्षे प्रलंबित आहेत, अजूनही प्रकल्प सुरु झालेले नाहीत. हे प्रकल्प ठराविक काळातच पूर्ण व्हावेत, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. प्रलंबित कामांना गती द्यावी, अशी मागणी आयुक्तांकडे आम्ही केली आहे.

सिंहगड रोड उड्डाणपूल व धायरी येथील पुलाचा प्रश्न कायम आहे. वारज्याच्या पुढील वडगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर केलेल्या पुलावरील एक मार्गीका पुढील आठवड्यात उघडण्यात येणार आहे. याच ठिकाणी केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी बदल सुचविला आहे.

येथील वाहतूक कोंडी सुटली तरीही, कात्रजमधील वाहतूक कोंडी सुटणार नाही. त्यामुळे सर्व काम गतीने झाले तरच, वाहतूक कोंडीची समस्या सुटेल. रिंगरोडचे कामही वेळेत पूर्ण झाले पाहीजे. मात्र महाराष्ट्रात प्रकल्पांच्या खर्चात नंतर वाढ होत असल्याचे आव्हान उभे राहिले आहे. प्रकार गडकरी यांनी मांडला आहे. वाढीव खर्च होतो कसा?'

कलाकार कट्ट्यासंबंधी सुळे म्हणाल्या, 'नामदार गोपाळकृष्ण गोखले चौकातील (फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता) कलाकार कट्टा हटविण्याचा प्रयत्न सुरु आहे. मात्र हा सांस्कृतिक कट्टा हा युवा पिढीसाठी एक चांगले ठिकाण आहे. मुलांमध्ये असणारे कलेचे गुण व्यक्त करण्यासाठी या जागेचा उपयोग होतो आहे. त्यामुळे हा कट्टा हटवू नये, अशी मागणी आयुक्तांकडे केली आहे.'

महापालिकेकडून समाविष्ट गावांसाठी आकारला जाणाऱ्या जादा कराविरुद्ध आम्हीच आंदोलन केले होते, त्यामुळे त्यावर स्थगिती आली होती. समाविष्ट गावांना रस्ते नाही, पाणी टँकरने पुरविले जाते, अजूनही प्रश्न सुटलेले नाहीत. जर महापालिका समाविष्ट गावांना मुलभूत सोई-सुविधाच देत नसेल, तर समाविष्ट गावांमधील नागरिकांना कर तरी कसा लावता?

पाण्याच्या दहा-दहा टाक्या तयार आहेत, मात्र शेवटच्या टप्प्यांमधील काम राहिल्याने पाणी मिळू शकत नाही.हे काम प्रशासनाने केले पाहीजे, त्याबाबत महापालिका आयुक्तांना पत्र दिले आहे. महापालिका आयुक्त चांगले आहेत, ते नक्कीच या प्रश्नातून मार्ग काढतील, असे सुळे यांनी सांगितले.

### सुळे म्हणाल्या,

- **मिसींग लिंक व सेवा रस्त्यांसंबंधी महापालिका स्वतंत्र माहिती घेऊन काम करणार**
- **पाणी, कचरा, ट्रॅफिक व प्रदूषणावर काम करावे, अशी मागणी आयुक्तांकडे केली**
- **भाजप-कॉंग्रेस आंदोलनातील दगडफेक चुकीचा प्रकार, राजकीय पक्षांमध्ये कटुता असता कामा नये**
- **दौंडमधील घटनेबाबत पोलिसांशी, स्थानिकांशी चर्चा झाली.**
- **पोलिस अधीक्षकांनी तेथे शांतता रहावी, याबाबत आवाहन करावे**



# निकालानंतर प्रथमच राज–शिंदे भेट

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर प्रथमच राज ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकत्र आल्याचे दिसून आले. राज ठाकरे यांनी ठाण्यातील ‘नंदनवन’ बंगल्यावर जाऊन शिंदे यांची भेट घेतली. सुमारे २० ते २५ मिनिटे दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

शिवसेना पक्षातील फुटीनंतर मुख्यमंत्री बनलेल्या शिंदेंची राज ठाकरे यांनी यापूर्वी भेट घेऊन अभिनंदन केले होते. त्यानंतरही दोघांमध्ये वेळोवेळी भेटी झाल्या. लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ ठाण्यात सभा घेतली होती. मात्र, महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही नेते एकमेकांविरुद्ध मैदानात उतरले होते. तरीही राज ठाकरे यांनी शिंदे यांच्यावर थेट टीका टाळल्याचे दिसून आले.

### केडीएमसी पाठिंब्यावर पुन्हा चर्चा

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेने सर्वाधिक जागा जिंकल्या. मनसेला अपेक्षित यश मिळाले नाही.

मात्र, महापौर निवडीवेळी मनसेच्या नगरसेवकांनी शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. शिवसेना विरुद्ध शिवसेना असा संघर्ष असताना, मनसेचा हा पाठिंबा चर्चेचा विषय ठरला होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, मनसेच्या पाठिंब्याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी राज ठाकरे यांचे आभार मानले. तसेच, महापालिका सभागृहातील कामकाजात मनसेचे सहकार्य राहील, असे आश्वासन राज ठाकरे यांनी दिल्याचे बोलले जाते.

त्यामुळे या भेटीत केडीएमसीसह इतर राजकीय घडामोडींवरही चर्चा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या भेटीवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली. “एकनाथ शिंदे आमचे विरोधी नेते असले तरी ते राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. तसेच राज ठाकरे मनसेचे प्रमुख आहेत. त्यामुळे त्यांनी कोणाला भेटावे किंवा न भेटावे, यावर आम्ही भाष्य करू शकत नाही. या भेटीत आक्षेपार्ह असे काही नाही,” असे त्या म्हणाल्या.

महापालिका निवडणुकांनंतर राज–शिंदे भेटीमुळे राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

# शिवजयंती सोहळ्यापूर्वी शिवनेरीवर मध्यरात्री चेंगराचेंगरी; शिवभक्त जखमी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असलेल्या किल्ले शिवनेरीवर शिवजयंतीनिमित्त मोठा उत्साह सुरू आहे. मोठ्या संख्येने शिवभक्तांची शिवनेरी गडावर मध्यरात्रीपासूनच गर्दी होण्यास सुरुवात झाली आहे. मध्यरात्रीपासूनच गडाचा परिसर ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. मात्र, क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि याचदरम्यान चेंगरीचेंगरीची घटना घडली आहे. किल्ल्यावरील अंबरखाना परिसरातील अरुंद दरवाजात शिवभक्तांची प्रचंड गर्दी झाल्याने चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली.



या घटनेत काही शिवभक्त जखमी झाले. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. शिवजयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो शिवभक्त शिवनेरी किल्ल्यावर दाखल झाले आहेत. मध्यरात्रीच्या सुमारास अंबरखाना परिसरातील हत्ती दरवाजा आणि गणेश दरवाजा यांच्या दरम्यान असलेल्या एका अरुंद दरवात गर्दी अवाक्याबाहेर झाली.

येथील जागा अरुंद असल्याने आणि लोकांची संख्या प्रमाणाबाहेर गेल्याने चेंगराचेंगरीची स्थिती झाली. यात काही शिवभक्त खाली पडले आणि जखमी झाले.

दरम्यान, किल्ले शिवनेरीवर आज छत्रपती शिवाजी महाराजांचा ३९६ वा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. संपूर्ण शिवनेरी परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला असून भगव्या रंगात न्हाऊन निघाला असून शिवभूमीचे दृश्य पाहण्यासाठी राज्यभरातून शिवभक्त मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. गावागावांमधून शिवभक्त सायकल रॅलीसह पायी चालत शिवज्योत घेऊन किल्ले शिवनेरीवर पोहोचले आहेत. मात्र या घटनेदरम्यान येथे पोलिस प्रशासन नसल्याची माहिती समोर आली आहे. पुरेसा बंदोबस्त नसल्याने चेंगराचेंगरीची घटना घडल्याचेही काहींनी म्हटले आहे.

## भोंडेकर यांना मदतीचे आवाहन



**वेल्हे (दै. आरंभ पर्व)**

मावळा जवान संघटनेतील एक युवक सहकारी अमर भोंडेकर सध्या अत्यंत गंभीर आरोग्य संकटाचा सामना करत असून, त्यांच्या उपचारासाठी सर्व स्तरातून मदतीचे आवाहन करण्यात येत आहे.

अमर भोंडेकर यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या असून, डॉक्टरांनी तातडीने किडनी ट्रान्सप्लांट (Kidney Transplant) करण्याचा सल्ला दिला आहे. संबंधित शस्त्रक्रिया पुण्यातील जहांगीर रुग्णालयात होणार असून, त्यांना दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रुग्णालयात दाखल करण्यात येणार आहे.

या शस्त्रक्रियेसाठी साधारण १२.५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, अमर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने एवढी मोठी रक्कम उभारणे त्यांच्या कुटुंबासाठी अशक्यप्राय ठरत आहे. अचानक आलेल्या या वैद्यकीय संकटामुळे कुटुंबीयांवर मोठा आर्थिक व मानसिक ताण निर्माण झाला आहे.

मावळा जवान संघटनेच्या वतीने तसेच मित्रपरिवारातून अमर यांना जीवनदान मिळावे, या भावनेतून समाजातील नागरिक, दाते, सामाजिक संस्था व सहृदय व्यक्तींनी पुढाकार घेऊन मदतीचा हात द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

"आपण दिलेली अगदी छोटीशी मदतही अमरला नवजीवन देऊ शकते," अशी भावनिक विनंती कुटुंबीयांनी केली आहे.

अमर यांच्या उपचारासाठी समाजातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहकार्य मिळावे आणि त्यांना लवकरात लवकर नवजीवन मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

- **मदत पाठविण्याची माहिती:**
- **Google Pay/ PhonePe: 8055579013**
- **नाव: अमर भोंडेकर**

## थोडक्यात पण महत्वाचे



### भाजप प्रभाग अध्यक्ष राजू कुटे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**पुणे (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक ३४ भारतीय जनता पार्टीचे प्रभाग अध्यक्ष राजू कुटे यांच्या वाढदिवसानिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत वाढदिवस साजरा केला. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते राजू कुटे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, हरिदास चरवड, जयश्री भूमकर, कोमल नवले, मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे,युवासेना जिल्हा प्रमुख सोमनाथ कुटे, सतीश कुटे, कोमल सतीश कुटे, माजी उपसरपंच सागर भूमकर, सारंग नवले, महाराष्ट्र चॅम्पियन पै.तुषार पोकळे, माजी ग्रा.पं सदस्य प्रदीप कुटे,प्रवीण कुटे, माजी उपसरपंच अक्षय इंगळे,जीवन कुटे, आकाश कुटे, निवेदक राज शिनारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा व्यक्त केल्या व त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचे कौतुक केले. वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह दिसून आला. यावेळी बोलताना राजू कुटे म्हणाले की, "वाढदिवस हा केवळ निमित्त असतो; मात्र या निमित्ताने मिळणाऱ्या शुभेच्छा आणि प्रेम निश्चितच पुढील कार्यासाठी उभारी देणारे असते. प्रभागातील नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी आणि जनतेच्या हितासाठी अधिक जोमाने काम करणार आहे." कार्यक्रमात स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**



### ऑलिम्पिक आयोजित करण्याच्या दृष्टीने जोरदार तयारी सुरू : रक्षा खडसे

**पुणे (आरंभ पर्व) : क्रीडा क्षेत्रात आगामी काळात मोठे बदल पाहायला मिळणार आहेत. भारतामध्ये २०३६ चे ऑलिम्पिक आयोजित करण्याच्या दृष्टीने जोरदार तयारी सुरू झाली आहे. खेलो इंडिया या उपक्रमाच्या माध्यमातून खेळाला गावपातळीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. यासाठी देशात १०० 'साई' सेंटर्स आणि खेलो इंडिया सेंटर्सचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. 'विकसित भारत' मोहिमेत फिटनेसला अनन्यसाधारण महत्त्व असून 'फिट इंडिया' उपक्रम प्रभावीपणे राबविला जात असल्याची माहिती केंद्रिय राज्य क्रीडामंत्री रक्षा खडसे यांनी दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालापप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले आणि लक्ष्मण खोत उपस्थित होते. अलीकडच्या काळात जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर एका खेळाच्या दोन-दोन संघटना अस्तित्वात आहेत. त्यांचे वाद न्यायालयापर्यंत पोहोचले असून वर्षोनुवर्षे हे वाद सुरु असतात. परंतु, नव्या क्रीडा धोरणानुसार आता केंद्रिय पातळीवर निवृत्त अधिकारी आणि खेळाडूंची समिती नेमून तेथेच वाद मिटविले जाणार असल्याचे सांगून खडसे म्हणाल्या, क्रीडा संघटनांमधील राजकारण आणि प्रशासकीय गोंधळ दूर करण्यासाठी सरकार कठोर पावले उचलत आहे. अनेक क्रीडा संघटनांच्या निवडणुका वेळेवर होत नाहीत किंवा त्यात पारदर्शकता नसते. आता या संघटनांवर प्रशासक म्हणून प्रांत किंवा तहसिलदार या पदावरील निवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा विचार सुरू आहे. अनेकदा एकाच खेळासाठी दोन समांतर संघटना कार्यरत असतात, ज्याचा फटका खेळाडूंना बसतो. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार एक समिती नेमणार आहे. त्याचबरोबर समितीसमोरच या संघटनांमधील वाद ही मिटवला जाणार आहे.**

# अध्यात्मिक उन्नतीसाठी महाशिवरात्री व्रत महत्त्वाचे

## डॉ. रवींद्र भोळे : वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व प्रवचन सोहळा संपन्न



**पुरंदर (वाघापूर) (दै. आरंभ पर्व)**

महाशिवरात्री हा दिवस साधकांसाठी स्फूर्तीदायक असून अध्यात्मिक उन्नतीसाठी या व्रताचे विशेष महत्त्व आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार ह.भ.प. डॉ. रवींद्र भोळे यांनी केले. वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिरात आयोजित महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्यात ते बोलत होते.

डॉ. भोळे म्हणाले, महाशिवरात्रीच्या दिवशी नवीन चेतना निर्माण होते. संसारातील दुःखरूपी विष सहन करून सकारात्मकतेने पुढे जाण्याची प्रेरणा या पर्वातून मिळते. नवोदित वधू-वरांसाठीही हा दिवस जीवनातील तडजोडी व समन्वय शिकवणारा ठरतो. योग्य साधकांना या दिवशी योगसामर्थ्य प्राप्त होते.

सह्याद्रीच्या कुशीतील नैसर्गिक अरण्यात वसलेले वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिर अत्यंत प्राचीन व जागृत देवस्थान असल्याचेही त्यांनी नमूद केले. नवनाथांपैकी अडबंगनाथ यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाल्याची श्रद्धा असून येथे केलेली साधना फलदायी ठरते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी पोलीस अधिकारी कृष्णाजी इंदलकर, अर्जुन भाऊ फौजी, ह.भ.प. बापूसो गायकवाड महाराज, देवेंद्र पांडुरंग कुंजीर, विजय तुकाराम कुंजीर, वसंत गुरुजी, रोहिदास कुंजीर, रामदास आप्पा, कैलास तात्या, बाजीराव नाना कुंजीर, अरुण तात्या, रामचंद्र कुंजीर, अशोक कुंजीर, गौतम दादा कुंजीर, मच्छिंद्र कुंजीर, दादा कुंजीर, बापू कुंजीर, योगेश कड, रावनाना कुंजीर, माऊली इंदुलकर, संतोष कुंजीर, नारायण देव तसेच वाघापूरच्या सरपंच सौ. दिपाली कुंजीर, सौ. सविता कुंजीर, सौ. दीक्षित बाई, सौ. विजयंता इंदलकर, सौ. सुमनताई वाईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. अनंता महाराज परदेशी, ह.भ.प. सतीश महाराज खोमणे, ह.भ.प. झाडे महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज पवार, ह.भ.प. श्रीपाद महाराज जाधव तसेच वारकरी भूषण ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांची सुश्राव्य कीर्तने झाली. तसेच दिव्यानंदगिरी मौनगिरी महाराज यांनी शिवपुराणावर आधारित प्रवचन केले.

श्री माणकेश्वर महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताहाचे हे सतरावे वर्ष असून समस्त ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर मोठ्या भक्तिभावाने धार्मिक सोहळा संपन्न झाला.

## सुमित अंबेकर यांचा पुण्यात गृहप्रवेश सोहळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मीडिया वर्ल्ड न्यूज नेटवर्कचे संस्थापक व संचालक सुमित अंबेकर (जैन) यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासाला १० वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्त पुण्यात त्यांच्या नवीन घराचा गृहप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सप्टेंबर २०१६ मध्ये केवळ १२०० रुपये खिशात, आई-वडिलांचे आशीर्वाद आणि मोठी स्वप्ने मनात घेऊन सुमित अंबेकर यांनी पुण्यात पाऊल ठेवले. कोणतीही ओळख किंवा आधार नसताना शिक्षण घेताना विविध छोट्या-मोठ्या कामांमधून त्यांनी स्वतःला घडवले आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि सरळ मार्ग या मूल्यांवर विश्वास ठेवत त्यांनी गेल्या दशकात अनेक चढ-उतारांचा सामना केला. कोरोना महामारीसारख्या कठीण काळातूनही ते खंबीरपणे उभे राहिले. संघर्षातून घडलेली त्यांची ही वाटचाल आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या प्रवासात



शेकडो मित्र, मार्गदर्शक आणि हितचिंतकांची साथ लाभली असून समाजातील विविध घटकांशी त्यांनी विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. या दशकपूर्तीचा महत्त्वाचा टप्पा म्हणून शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे शहरात त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या घरात गृहप्रवेश सोहळा पार पडणार आहे. हा सोहळा केवळ घरप्रवेशाचा नसून स्वप्नपूर्ती आणि दशकभराच्या संघर्षाचा साक्षीदार ठरणार आहे. या यशस्वी वाटचालीत साथ देणाऱ्या सर्वांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले असून पुढील प्रवासातही पुणेकरांचे आशीर्वाद आणि सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बहुली-कुडजे-सांगरुण-एनडीए मुख्य रस्ता खड्डेमय

- **धोकादायक गतिरोधकांमुळे अपघाताचा धोका**



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

दहा नंबर गेट ते बहुली-सांगरुण-कुडजे (ता. हवेली) या मुख्य मार्गावरील प्रवास सध्या असंख्य खड्ड्यांमुळे अत्यंत धोकादायक बनला आहे. विशेषतः बाह्यवळणांवरील खोल खड्डे चुकवताना वाहनचालकांचे नियंत्रण सुटण्याच्या घटना घडत असून अपघाताचा धोका वाढला आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.

दहा नंबर गेट ते कुडजे हा रस्ता Pune Municipal Corporation च्या हद्दीत येतो, तर कुडजे ते बहुली हा मार्ग Public Works Department Maharashtra कडे आहे. दरम्यान, सांगरुण ते बहुली दरम्यान Maharashtra State Road Development Corporation (एमएसआरडीसी) च्या रिंगरोडचे काम सुरू आहे. विविध विभागांच्या अखत्यारित येणाऱ्या या मार्गावरील समन्वयाअभावी सर्वत्र रस्ते खड्डेमय झाले असून प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

या मार्गावरून विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी तसेच पर्यटक मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. त्यामुळे रोजच्या प्रवासात वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वारांना विशेष धोका निर्माण झाला असून चारचाकी व अवजड वाहनांचीही सतत वर्दळ असते.

मांडवी बुद्रुक येथे मुख्य रस्त्यावर पुलाचे काम सुरू आहे. सांगरुणकडून मांडवीमार्गे पुण्याकडे जाताना तीव्र उतारावर सलग चार गतिरोधक उभारण्यात आले आहेत. मात्र या गतिरोधकांची उंची कमी असून ते लांबून स्पष्ट दिसत नाहीत. रिफ्लेक्टर, पांढरे पट्टे किंवा सूचना फलक नसल्याने रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिकच धोकादायक बनते. यापूर्वी येथे किरकोळ अपघात घडले असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

"सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रार करूनही याकडे लक्ष दिले जात नाही," अशी प्रतिक्रिया विकी अशोक मानकर यांनी दिली. स्थानिकांनी तातडीने खड्डे बुजवून रस्ता समतल करावा, गतिरोधकांवर स्पष्ट चिन्हांकन करावे व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी, अशी मागणी केली आहे.

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचा 'पर्सोना' सांस्कृतिक महोत्सव आजपासून

सिने अभिनेत्री भाग्यश्री पटवर्धन, सिनेगीतकार समीर अंजान, गायक अमित मिश्रा, अभिनेत्री प्राची पांडे यांची उपस्थिती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोणी-काळभोर येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाचा बहुप्रतिक्षित वार्षिक टेक्नो-कल्चरल फेस्टिव्हल 'पर्सोना फेस्ट-२०२६' आजपासून सुरू होत असून हा भव्य महोत्सव १९ ते २१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवात देशभरातील १३० हून अधिक महाविद्यालये व विद्यापीठांमधील सुमारे २० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागाची अपेक्षा आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून, 'मैंने प्यार किया' चित्रपट फेम अभिनेत्री भाग्यश्री पटवर्धन यांच्यासह राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त सिने दिग्दर्शक-निर्माते समृद्धी पोरे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष तथा कुलपती डॉ. विश्वनाथ कराड भूषवतील. तसेच कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.


तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात देशभरातील नामवंत गायक, सिनेगीतकार व कलाकारांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. यामध्ये ज्येष्ठ सिनेगीतकार समीर अंजान, सुप्रसिद्ध गायक अमित मिश्रा, अभिनेत्री प्राची पांडे, मराठी अभिनेता क्षितीज दाते, सेलिब्रिटी आर.जे. संग्राम खोपडे, सेलिब्रिटी डान्सर सिद्धेश थोरात तसेच पुणे महानगरपालिकेतील २२ वर्षीय युवा नगरसेविका कु. सिद्धी शिलिमकर यांचा समावेश आहे.

याशिवाय या टेक्नो-कल्चर महोत्सवात नामांकित गायक व बँड यांचे थेट संगीत सादरीकरण (लाईव्ह कॉन्सर्ट), तंत्रज्ञान, व्यवसाय, कला व संस्कृती यांसारख्या विविध क्षेत्रांवरील माहितीपर सत्रे, विद्यार्थ्यांच्या नृत्य-नाट्य सादरीकरणांसह कोडिंग व तांत्रिक स्पर्धा, क्रीडा आणि इतर मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी आणि कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

## प्रा. विजयेंद्र गायकवाड यांना पीएच .डी. प्रदान

**कात्रज, पुणे (दै. आरंभ पर्व)**

कात्रज, पुणे येथील पीआयसिटी कॉलेज च्या कॉम्प्युटर अभियांत्रिकी विभागातील प्रा. विजयेंद्र गायकवाड यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथून पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी "डिझाईन ऑफ एफिशंट अ‍ॅप्रोच फॉर प्रायव्हसी प्रिझर्व्हिंग क्लासिफिकेशन इन आउटसोर्स्ड क्लाऊड एन्व्हायर्नमेंट" या विषयावर सखोल संशोधन केले. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. किशोर वळसे (विद्यापीठ संशोधन केंद्र) यांचे मार्गदर्शन लाभले. क्लाऊड एन्व्हायर्नमेंटमध्ये डेटा गोपनीयता जपताना कार्यक्षम वर्गीकरण कसे साधता येईल, यावर हे संशोधन केंद्रित आहे. डेटा सुरक्षितता आणि



तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रभावी संगम या संशोधनातून साधला गेला असून, आयटी व क्लाऊड संगणन क्षेत्रात हे कार्य महत्त्वपूर्ण मानले जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एस. टी. गंधे, विभागप्रमुख डॉ. बळवंत सोनकांबळे, सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून प्रा. गायकवाड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# सातार्‍यातून हरवलेल्या आजीचा पुण्यात महिन्यानंतर शोध

## नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द



शिवाभाऊ पासलकर (जनसेवक), पुणे (मोबाईल : ९३२६४२५८५८)

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथून हरवलेल्या ७० वर्षीय अहिल्याबाई गुंडाप्पा पवार या आजींचा पुण्यात महिन्यानंतर शोध लागून त्यांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द करण्यात आले.

३० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता सिंहगड रोडवरील हिंगणे चौक परिसरात अहिल्याबाई पवार या आढळून आल्या होत्या. त्यांना स्वतःचा पत्ता किंवा नातेवाईकांबाबत कोणतीही माहिती देता येत नव्हती. त्यानंतर त्यांना सिंहगड रोड पोलीस ठाण्यात आणण्यात आले. येथे महाराष्ट्र मिसिंग ग्रुपचे अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर यांच्या मदतीने आजींची शोधपत्रिका तयार करून ती सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आली.

यानंतर आजींना माणिकबाग, सिंहगड रोड येथील 'आभाळ माया' वृद्धाश्रमात तात्पुरती व्यवस्था करून ठेवण्यात आले. सुमारे एका महिन्याच्या प्रयत्नांनंतर सिंहगड रोड पोलीस ठाणे व महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप यांच्या सहकार्याने आजींच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात यश आले.

त्यानुसार सातार्‍यातील म्हसवड येथून त्यांच्या दोन मुलींना पुण्यात बोलावण्यात आले. त्यानंतर पोलीस ठाण्यात आजींना त्यांच्या मुलींच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले. नातेवाईकांनी पोलीस प्रशासन व महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे मनापासून आभार मानले.

या शोध मोहिमेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, उपनिरीक्षक वाघमोडे तसेच विठ्ठलवाडी चौकीचे कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

### महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप : बेपत्ता व्यक्तींसाठी आशेचा आधार

**समाजात बेपत्ता होणाऱ्या व्यक्तींच्या घटना वाढत असताना त्यांच्या शोधासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. अशाच प्रकारे "महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप" ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत असून अनेक कुटुंबांना दिलासा देण्याचे काम करत आहे. या ग्रुपचे संस्थापक शिवाभाऊ पासलकर हे गेल्या १५ वर्षांपासून निःस्वार्थ भावनेने समाजसेवा करत आहेत. बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी त्यांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून एक मजबूत नेटवर्क तयार केले आहे. बेपत्ता व्यक्तीची माहिती मिळताच ती तात्काळ व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसारित केली जाते. तसेच संबंधित कुटुंबीयांना त्वरित पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा सल्ला देत आवश्यक मार्गदर्शन केले जाते. नागरिकांच्या सहकार्यामुळे माहिती वेगाने पसरते आणि शोध मोहिमेला गती मिळते. या संस्थेने आतापर्यंत १००० हून अधिक बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अनेक कुटुंबांना त्यांच्या हरवलेल्या सदस्यांशी पुन्हा भेट घडवून आणण्यात या ग्रुपचा मोठा वाटा आहे. समाजातील नागरिक, पोलिस प्रशासन आणि स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हे कार्य अधिक परिणामकारक ठरत आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाने अशा उपक्रमांना सहकार्य करणे गरजेचे आहे. वेळेवर दिलेली माहिती किंवा सोशल मीडियावर केलेली एक पोस्टही एखाद्या व्यक्तीला शोधण्यात निर्णायक ठरू शकते. महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी असून मानवतेचा संदेश देणारे आहे. आजच्या डिजिटल युगात माहिती वेगाने पोहोचवणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप या माध्यमांचा योग्य वापर करून पोलिस प्रशासन आणि नागरिक यांच्यात एक दुवा म्हणून काम करतो. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक जीव वाचले आणि कुटुंबांना आधार मिळाला.**




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





## थोडक्यात पण महत्वाचे



### अमृत महोत्सवी वर्षात रंगद्रव्य उत्पादक 'सुदर्शन'ची जागतिक भरारी

SUDARSHAN 75 YEARS OF COLOR EXCELLENCE

- ७५ वर्षांत १९ उत्पादन केंद्रांसह १२० देशांत विश्वासार्ह सेवा; शाश्वत विकासासाठी सामाजिक कार्यातही पुढाकार

पुणे (आरंभ पर्व) : रंगद्रव्य उत्पादनांत अग्रेसर असलेल्या सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडने आपला अमृत महोत्सव साजरा करतानाच जागतिक भरारी घेतली आहे. ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण करताना जर्मनीस्थित ह्युबॅक ग्रुपचे अधिगृहण करताना १२० पेक्षा अधिक देशांत रंगद्रव्य उत्पादनांची सेवा देणारी सुदर्शन केमिकल एकात्मिक जागतिक कंपनी बनली आहे. 'वन सुदर्शन' या संकल्पनेंतर्गत विविध घटक, तंत्रज्ञान आणि संस्कृतींना एकत्र आणून सातत्यपूर्ण, उच्च कार्यक्षम व शाश्वत रंग उपाय देण्यावर कंपनीचा भर आहे. पुण्यात १९५१ मध्ये स्थापन झालेल्या सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने गेल्या ७५ वर्षात विश्वासार्ह व ग्राहकाभिमुख सेवा देत रायगड जिल्ह्यातील रोहा व महाडसह जगभरात १९ उत्पादन केंद्र, १२० देशांत रंगद्रव्यांचा पुरवठा व हजारो कर्मचाऱ्यांना रोजगाराची संधी दिली आहे. गेल्या सात दशकांत सुदर्शनने कोटिंग्स, प्लास्टिक्स, शाई, सौंदर्यप्रसाधने आणि विशेष अनुप्रयोगांसाठी वापरल्या जाणाऱ्या रंगद्रव्य क्षेत्रात विश्वासार्ह जागतिक भागीदार म्हणून ओळख निर्माण केली आहेसुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे ग्लोबल चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश राठी म्हणाले, "७५ वर्षांचा प्रवास साजरा करताना आनंदाची भावना आहे. कंपनीच्या सुरुवातीपासून साधेपणा, काटेकोर अंमलबजावणी, ग्राहक व नियामक मानकांचे पालन आणि शाश्वत उत्पादन यावर भर देण्यात आला. रायगड जिल्ह्यातील रोहा आणि महाड येथील उत्पादन प्रकल्पांनी या मूल्यांना बळकटी दिली असून, कंपनीच्या कार्यक्षमतेत आणि सामाजिक सहभागात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. 'सुदर्शन'ने मार्च २०२५ मध्ये जर्मनीस्थित ह्युबॅक ग्रुपचे अधिग्रहण केले. 'सुदर्शन'च्या प्रवासातील हा महत्वाचा टप्पा असून, यामुळे सुदर्शनची तांत्रिक क्षमता, उत्पादनाची व्यापकता आणि जागतिक स्तरावर अस्तित्व वाढले आहे."

### शाळकरी मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील घोटवडी येथे विहीरीत पोहायला गेलेल्या दहा वर्षीय शाळकरी मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. कैवल्य एकनाथ भोते (वय १० वर्षे, रा. वाशेरे - भोतेवाडी, ता. खेड) असे मृत मुलाचे नाव आहे. वडील आणि भावासोबत तो विहीरीवर पोहायला गेला होता. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत ही विहीर खोदण्यात आली होती. पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने कैवल्य खोल पाण्यात बुडाला. वन्यजीव रक्षक मावळ संस्था आणि लोणावळ्यातील शिवदुर्ग मित्र यांच्या पथकाने मुलाचा मृतदेह बाहेर काढला. तब्बल २४ तासानंतर त्याचा मृतदेह सापडला. ही विहीर सुमारे ५० फूट खोल असल्याने स्थानिक ग्रामस्थांना मुलाचा शोध घेणे कठीण जात होते. घटनेची माहिती मिळताच खेड पोलिसांनी अग्निशामक दल आणि स्थानिक आपत्कालीन पथकाला पाचारण केले. विहिरीतील गाळ आणि खोलीमुळे शोधकार्यात मोठे अडथळे येत होते.या शोधमोहिमेत निलेश गराडे, गणेश गायकवाड, मयुर चौधरी, जिगर सोळंकी आणि राजेंद्र बंडगे यांनी सहकार्य केले.

### क्वालकॉमने १५० दशलक्ष डॉलर्सपर्यंत गुंतवणुकीची घोषणा

Qualcomm ventures

पुणे (आरंभ पर्व) : क्वालकॉम इन्कॉर्पोरेटेडने आज भारतातील वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान आणि एआय स्टार्टअप इकोसिस्टमला पाठिंबा देण्यासाठी 150 दशलक्ष डॉलर्सपर्यंत गुंतवणूक करण्याचा निर्णय जाहीर केला. ही गुंतवणूक क्वालकॉम व्हेंचर्समार्फत केली जाणार असून सर्व स्तरांवरील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली जाईल. विशेष लक्ष एआयच्या ऑटोमोटिव्ह, आयओटी, रोबोटिक्स आणि मोबाईल क्षेत्रांवर असेल. ही पुढाकार क्वालकॉमच्या भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रातील दीर्घकालीन बांधिलकीचे प्रतीक आहे आणि जागतिक स्तरावर edge AI पुढे नेण्याच्या नेतृत्वाशी सुसंगत आहे. ही घोषणा क्वालकॉमचे सीईओ क्रिस्टियानो अमोन यांच्या नवी दिल्लीतील इंडिया एआय इम्पॅक्ट समिट मधील सहभागाच्या वेळी करण्यात आली. क्वालकॉम इन्कॉर्पोरेटेडचे अध्यक्ष आणि सीईओ क्रिस्टियानो अमोन म्हणाले, "आमच्या नवीन स्ट्रॅटेजिक एआय व्हेंचर फंड द्वारे क्वालकॉम भारतातील एआयचे पुढचे पर्व घडवणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत आहे. एआय आता अशा टप्प्यात प्रवेश करत आहे जिथे बुद्धिमत्ता थेट लोक रोज वापरत असलेल्या उपकरणे आणि प्रणालींमध्ये समाविष्ट होत आहे. स्मार्टफोन, पीसी, गाड्या, औद्योगिक यंत्रे, रोबोट्स आणि इतर अनेक गोष्टींमध्ये. यामुळे अनुभव अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण होणार आहेत. हा बदल संपूर्ण उद्योगांना नव्याने आकार देईल आणि भारतातील स्टार्टअप इकोसिस्टम यात महत्त्वाची भूमिका बजावेल." भारताच्या स्टार्टअप क्षेत्रातील प्रचंड वाढ आणि एआयच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे क्वालकॉमला नव्या कंपन्यांना बाजारात अग्रगण्य उपाय तयार करण्यात मदत करण्याची संधी दिसत आहे. जागतिक स्तरावर कार्यक्षम, सुरक्षित आणि शक्तिशाली एज एआय पुढे नेणाऱ्या नेत्याच्या भूमिकेत क्वालकॉम अशा स्टार्टअप्सना पाठिंबा देत आहे जे पुढच्या नवोन्मेषाच्या लाटेला आकार देणार आहेत.

## जगदाळे कुटुंबासह खासदार मेधा कुलकर्णी यांनी घेतली

# एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडित जगदाळे कुटुंबातील प्रगती जगदाळे व त्यांची कन्या आसावरी जगदाळे यांच्यासमवेत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी मुंबईत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आसावरी यांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्याबाबत सविस्तर चर्चा केली.





एकनाथ शिंदे व चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनीही या विषयाची संवेदनशीलता लक्षात घेत तात्काळ मुख्यमंत्री कार्यालयातील सचिव श्रीकर परदेशी, गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. तसेच पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. दोघांनीही या विषयात तत्परतेने लक्ष घालून कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याबद्दल जगदाळे कुटुंबीय व मेधा कुलकर्णी यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "स्वर्गीय संतोष जगदाळे यांच्यावर पहलगाम येथे केवळ हिंदू असल्यामुळे झालेला हल्ला ही अत्यंत वेदनादायी आणि अस्वस्थ करणारी घटना होती. त्या दुःखद प्रसंगी महाराष्ट्रातील अनेक मान्यवर नेत्यांनी आसावरी यांना शासकीय सेवेत संधी देण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला दहा महिने उलटल्यानंतर या विषयाची तातडीने दखल घ्यावी यासाठी, माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले, तसेच गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यानंतर आता या दोन्ही नेत्यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. या प्रकरणाला आता गती मिळताना दिसत असून, ही दिलासा देणारी बाब आहे.

श्रीमती प्रगती आणि त्यांची कन्या आसावरी यांना दिलेले आश्वासन सरकार लवकरात लवकर पूर्ण करेल, असा मनापासून विश्वास आहे. कारण हा केवळ एका कुटुंबाचा प्रश्न नसून न्याय, संवेदना आणि सामाजिक जबाबदारी यांचा विषय आहे. आसावरी उच्चशिक्षित असून, एमबीए केलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेत तिला प्रशासकीय पदावर किंवा वर्ग दोन श्रेणीतील नोकरी मिळावी, यासाठी प्रयत्नशील आहे, असेही प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी नमूद केले.

## गुजरात व कर्नाटक यांच्यात विजेतेपदासाठी लढत

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन (पीबीएमए) आणि ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन (बीसीए) तर्फे एचसीएलफाऊंडेशन च्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय टी20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेत गट साखळी फेरीत गुजरात, कर्नाटक या संघांनी आपली विजयी मालिका कायम ठेवत अंतिम फेरीत प्रवेश केला. डेक्कन जिमखाना मैदान व पद्ममावती येथील टेंबेकर मैदान येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत अ गटात प्रभू हलियाल(62धावा), रंगा एन(48धावा) यांनी केलेल्या सुरेख फलंदाजीच्या जोरावर कर्नाटक संघाने महाराष्ट्र संघाचा 32 धावांनी पराभव केला. ब गटात संजोय दरवडा(नाबाद 105धावा) याने केलेल्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर गुजरात संघाने पश्चिम बंगाल संघाचा 65 धावांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली.

दुसऱ्या औपचारिक लढतीत सनी चौहान 1-29 व नाबाद 34) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर चंदीगढ संघाने राजस्थान संघाचा 4 गडी राखून पराभव केला. स्पर्धेचा अंतिम सामना गुजरात व कर्नाटक यांच्यात डेक्कन जिमखाना मैदानावर सकाळी 9.30वाजता होणार आहे.

## लुईस फिलिपकडून 'तिकिट टू बहामास' कलेक्शन लाँच

### स्प्रिंग-समर २०२६ साठी कोस्टल लक्झरीची झलक

**बेंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला लाइफस्टाइल ब्रँड्स लिमिटेडच्या अंतर्गत असलेल्या प्रीमियम मेन्सवेअर ब्रँड लुईस फिलिपने स्प्रिंग-समर २०२६ साठी 'तिकिट टू बहामास' हे नवीन कलेक्शन लाँच केले आहे. आलिशान बीच क्लब आणि उष्णकटिबंधीय सहलींच्या अनुभवातून प्रेरित हे कलेक्शन आधुनिक पुरुषांसाठी खास डिझाइन करण्यात आले आहे.

उच्च श्रेणीतील रिसॉर्ट लिव्हिंगच्या भावनेतून साकारलेल्या या कलेक्शनमध्ये रंग, पोत आणि आकार यांचे आधुनिक संयोजन पाहायला मिळते. सिट्रस टोन्स, सॉर्बेट पेस्टल्स आणि उन्हाळ्यात थंडावा देणारे सौम्य रंग यांचा वापर करून आकर्षक समर लुक साकारण्यात आला आहे. लेमन व ऑरेंज रंगांतील लिनन शर्ट्स, पेस्टल पोलो, सॉर्बेट-टोन्ड शॉर्ट्स तसेच उष्णकटिबंधीय प्रिंट्स असलेले शर्ट्स या कलेक्शनची खासियत ठरत आहेत.

हवा खेळती राहील अशा हलक्या फॅब्रिक्सचा वापर, आरामदायी सिल्हूट्स आणि आधुनिक टेलरिंग यामुळे हे कलेक्शन सौंदर्याबरोबरच आरामालाही प्राधान्य देणाऱ्या आधुनिक पुरुषांसाठी उपयुक्त ठरणार आहे. सुट्ट्यांतील सहली, पूलसाइड ब्रंच, समुद्रकिनाऱ्यावरील सायंकाळ किंवा शहरातील कॅज्युअल भेटीगाठींसाठी हे कलेक्शन अनुकूल असल्याचे कंपनीने नमूद केले आहे.

लाँचबाबत बोलताना लुईस फिलिपचे चीफ बिझनेस ऑफिसर अनिल एस. कुमार म्हणाले, "तिकिट टू बहामास कलेक्शन आलिशान बीच क्लबमधील निवांत अनुभव साकारते. हलके फॅब्रिक्स, उन्हाळ्यास अनुरूप रंग आणि आकर्षक सिल्हूट्स यामुळे पुरुषांना कॅज्युअल वेअरमध्ये आत्मविश्वासाने वेगळा लुक मिळेल." हे कलेक्शन देशभरातील



लुईस फिलिप स्टोअर्स, अधिकृत रिटेलर्स तसेच ब्रँडच्या अधिकृत वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर उपलब्ध करण्यात आले आहे.

## निसानकडून 'ग्रॅव्हाइट'चे अनावरण

- ५.६५ लाखांपासून प्रारंभिक किंमत, ७-सीटर एमपीव्ही सेगमेंटमध्ये नवा पर्याय

**उदयपूर (दै. आरंभ पर्व)**

निसान मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (NMIPL) ने भारतातील बाजारपेठेसाठी 'न्यू निसान ग्रॅव्हाइट' या नवीन ७-सीटर एमपीव्हीचे अनावरण केले असून त्याची प्रारंभिक किंमत सुमारे ५.६५ लाख रुपये ठेवण्यात आली आहे. या मॉडेलमुळे निसानच्या भारतातील पुनरुज्जीवनाच्या धोरणाला गती मिळणार असल्याचे कंपनीने सांगितले आहे.निसानच्या 'प्रॉडक्ट ऑफेन्सिव्ह' मोहिमेअंतर्गत बाजारात येणारे हे पहिले उत्पादन असून, भारतीय कुटुंबांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन 'मेड इन इंडिया, मेड




फॉर इंडिया' या संकल्पनेवर आधारित या वाहनाची निर्मिती करण्यात आली आहे. चेन्नई येथे स्थानिक पातळीवर उत्पादन केल्याने कंपनीची भारतातील दीर्घकालीन वचनबद्धता अधोरेखित होते. ग्रॅव्हाइटमध्ये २ ते ७ आसनांची लवचिक व्यवस्था, मोठी सामान साठवण क्षमता आणि मॉड्युलर डिझाइन देण्यात आले आहे. यामध्ये ३० हून अधिक मानक सुरक्षा वैशिष्ट्यांचा समावेश आहे. सहा एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कंट्रोल, ट्रॅक्शन कंट्रोल, हिल स्टार्ट असिस्ट आणि ब्रेक असिस्ट यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. डिझाइनच्या बाबतीत निसानच्या खास 'सी' सिग्नेचर स्टाइलचा वापर करण्यात आला असून, फॉरेस्ट ग्रीन, ओनिक्स ब्लॅक, ब्लेड सिल्व्हर, स्टॉर्म व्हाइट आणि मेटॅलिक ग्रे या पाच रंगांमध्ये हे मॉडेल उपलब्ध होणार आहे. मर्यादित आवृत्तीत अधिक आरामदायी आणि तांत्रिक सुविधा देण्यात आल्या आहेत.

निसान आणि इन्फिनिटीचे मध्य पूर्व, केएसए, सीआयएस आणि भारत विभागाचे अध्यक्ष थियरी सब्बाग म्हणाले, "निसानच्या जागतिक धोरणात भारत महत्त्वाचा बाजार आहे. ग्रॅव्हाइट हे केवळ वाहन नसून भारतातील शाश्वत वाढीच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे." निसान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ वत्स म्हणाले, "भारतीय कुटुंबांची जीवनशैली, प्रवासाची पद्धत आणि वाढत्या आकांक्षा लक्षात घेऊन ग्रॅव्हाइटची रचना करण्यात आली आहे.




## 'सायको सैयां'मध्ये रवी किशन, तेजस्वी प्रकाश आणि अनुद सिंग ढाका प्रमुख भूमिकेत

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, ॲड-सपोर्टेड व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा देणाऱ्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज आपल्या आगामी रोमान्स-थ्रीलर सायको सैयां'च्या अधिकृत ट्रेलरची घोषणा केली आहे. ही कथा आपल्या नेहमीच्या प्रेमकथेसारखीच आहे, एका व्यापक, फिल्मीस्टाइल प्रेमकथेसारखी सुरू होत हळूहळू हृदयाचे ठोके वाढवते. या कथेत प्रेमातला आवेग आणि वेडेपणा दिसू लागतो आणि मग हे सगळे असह्य होते. रवी किशन, तेजस्वी प्रकाश आणि अनुद सिंग ढाका यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सिरिजमध्ये सृष्टी श्रीवास्तव, सुरभी चंदना, वरुण भगत, अश्विनी कलसेकर आणि यशपाल शर्मा यांच्याही मुख्य भूमिका आहेत.




या ट्रेलरमध्ये कार्तिक शायरीची आवड असलेल्या उज्जैनमध्ये राहणाऱ्या तरुणाची ओळख समोर येते, ज्याला वाटत असते की, त्याचे विश्व पूर्ण करणारी मुलगी त्याला सापडली आहे – चारू. त्याच्यासाठी, प्रेम म्हणजे निव्वळ टाइमपास नसून ते महाकाव्यासारखे परिपूर्ण आणि कोणतीही जोखीम घेण्याची तयारी असलेले असते. पण प्रत्येक तीव्रतेची किंमत मोजावी लागते. कार्तिकच्या भावना जसजशा खोल होत जातात, तसतसे प्रेमाला धरून ठेवण्याची गरजही वाढत जाते. तो शहरांमध्ये तिचा पाठलाग करतो, सगळ्या अधिकारांच्या विरोधात जातो आणि त्याच्या मार्गात अडथळा आणणाऱ्या कोणालाही आव्हान देतो. तो ज्याला प्रेम म्हणतो ते आता धोकादायक आणि मालकी हक्क गाजवणारे वाटू लागते.

उज्जैन, कटनी आणि जॉर्जियाच्या पार्श्वभूमीवरील या कलाकृतीच्या ट्रेलरमध्ये तीव्र संघर्ष, वाढती गुन्हेगारी शक्ती, भावनिक हेरगिरी आणि अधिकाधिक नाजूक वाटणाऱ्या नातेसंबंधांची झलक दाखवण्यात आली आहे. रवी किशन प्रत्येक वळणावर शक्तीचे संतुलन बदलणाऱ्या उपस्थितीसह ठाशीव भूमिकेत अंकुश ठेवतो. ज्यामुळे कथा अधिक मजबूत आणि धोकादायक वाटते. ट्रेलर संपल्यानंतर बराच काळ प्रश्न कायम राहतो- प्रेम सीमारेषा ओलांडून कधी पुढे जाते?

ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, "ॲमेझॉन एमएक्स प्लेयरमध्ये केवळ आकर्षकच नव्हे तर भावनांचे एक अद्वितीय मिश्रण असलेल्या कथा आणण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे. सायको सैयां'ची सुरुवात प्रेक्षकांना आवडणाऱ्या आकर्षक क्लासिक रोमान्सने होते. परंतु ही कथा थोड्याच अवधीत झटपट एका सखोल, मानसिक कथनात बदलून जाते. देशभरातील व्यापक आणि वैविध्यपूर्ण प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या लक्षवेधी, भावनिकदृष्ट्या आकर्षक कथा सादर करण्याच्या आमच्या व्यापक दृष्टीकोनात ही सिरीज बसते." आपल्या ओटीटीवरील पदार्पणाबद्दल तेजस्वी प्रकाश म्हणाली, "सायको सैयां हे माझे अभिनय करकीर्दीतील ओटीटी पदार्पण असून यात साकारलेल्या बहूपदरी पात्रासाठी मी आभारी आहे. चारू सुरुवातीला विश्वास आणि आरामात असते; परंतु तिचे जग बदलत राहते. त्या बदलाला ती कशाप्रकारे प्रतिसाद देते, शंका, भीती आणि काहीशा चुकीची वाढती जाणीव तिच्या प्रवासाला आकर्षक बनवते. जसजसा धोका वाढतो, तसतशी कधीही कल्पना न केलेल्या वास्तवाचा सामना करण्यास भाग पाडले जाते."

सुप्रसिद्ध अभिनेता रवी किशन पुढे म्हणाला, "सायको सैयां ही केवळ एक रोमान्टीक कथा नसून शक्तीचा वापर, नियंत्रण आणि अनियंत्रित भावनांच्या परिणामांबद्दल देखील आहे. माझ्या पात्रात प्रभावाची शक्ती आहे आणि त्याला त्यात आनंद मिळतो. तो त्याच्या स्वतःच्या नियमांनुसार खेळतो आणि त्या व्यक्तिरेखेसोबत एक विशिष्ट अनिश्चितता आणतो. ही एक अशी भूमिका आहे ज्याने मला तीव्र, बिनशर्त होण्याची आणि त्यानंतरच्या गोंधळात खूप मजा करण्याची संधी दिली" स्वत:च्या पात्राबद्दल बोलताना, अनुद सिंग ढाका म्हणाला, "कार्तिक हा सामान्य रोमान्टीक हिरो नाही, तर तो भव्य, महाकाव्य-आधारित आणि नियतीवर चालणाऱ्या प्रेमावर विश्वास ठेवतो. पण कथा जसजशी पुढे सरकत जाईल, तसतसे तुमच्या लक्षात येईल की समतोल नसलेले प्रेम धोकादायक ठरू शकते. नायकाची कृती वेडातून नव्हे तर उत्कटतेने येते. हीच कथानकाची जमेची बाजू म्हणावी लागेल. त्याच्या मनातला अतूट विश्वास, त्या मानसिकतेने पाऊल टाकणे आणि स्वत:च्या भावनांची आखणी करण्याचा तोल आव्हानात्मक आणि भूमिकेत झोकून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. कारण कार्तिकच्या जगात प्रेम सदोष नसते, ते अंतीम असते."

कथा जशी शेवटच्या क्षणांपर्यंत पोहोचते, तणाव ताणला जातो, निष्ठा तुटत जाते आणि भावना पेटून उठते. नियंत्रण राखण्याच्या नादात पकड घट्ट होत जाते आणि धोका निर्माण होतो. त्यामुळे वातावरण अस्थिर आणि कल्पनेच्या पलीकडे जाते. सायको सैयां'च्या दुनियेत, प्रेम या गोंधळातून वाचेल की हेच सर्वकाही तुटण्याचे कारण असेल? 'सायको सैयां' 25 फेब्रुवारीपासून केवळ ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य स्ट्रीम होणार आहे.






दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६









## थोडक्यात पण महत्वाचे

### वाघोलीत रंगणार ऐतिहासिक ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा



पुणे (आरंभ पर्व) : राज्यातील कुस्तीविश्वातील सर्वात मानाची समजली जाणारी 68 वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा यंदा पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे होणार आहे. 18 ते 22 मार्चदरम्यान ही भव्य स्पर्धा पार पडणार असून कुस्तीगीर परिषदेच्या पुण्यात झालेल्या बैठकीत वाघोलीच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. बैठकीला कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत 42 शहरांमधील सुमारे 840 कुस्तीगीर विविध वजनी गटांत सहभागी होणार आहेत. माती आणि गादी या दोन्ही प्रकारांत वरिष्ठ गटातील सामने रंगणार आहेत. दरवर्षीप्रमाणे विजेत्या मल्लाला मल्ल मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ 1 किलो चांदीची मानाची गदा प्रदान करण्यात येणार आहे, तर इतर गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येतील. महाराष्ट्र केसरी ही स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा नसून राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा एक भाग मानली जाते.

### शिवाजी महाराजांवरील युवाची लाँगबुक्स व सुविचार पेन्सिली उपलब्ध



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : महाराष्ट्रभरात साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर स्टेशनरी ब्रँड 'युवा'तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित शालेय साहित्याची विशेष मालिका सादर करण्यात आली आहे. सतराव्या शतकातील मराठा राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्मृतीत अत्यंत महत्त्वाचे असून, या उत्पादनांच्या माध्यमातून परिचित ऐतिहासिक संदर्भ थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतात.शाळांमधील विविध वयोगटांच्या गरजा लक्षात घेऊन ही श्रेणी साकारण्यात आली आहे. मोठ्या आकाराची ए4 लाँगबुक्स माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतात, तर पेन्सिली सर्वच वयोगटांतील विद्यार्थ्यांच्या वापरासाठी अनुकूल आहेत. या सर्व ए4 लाँगबुक्सवर छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित प्रसंग आणि प्रतीकांचे चित्रात्मक सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच या पेन्सिलींवर छोटे मराठी सुविचारही देण्यात आले आहेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुणांचे वर्णन करणारे सुविचारही समाविष्ट आहेत.









# विंगमॅनएक्स अवॉर्ड्समध्ये रायडिंग समुदायाचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विंगमॅनएक्स अवॉर्ड्स २०२५–२६ चा पहिला सोहळा हयात हॉटेल, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमात जबाबदारी, नेतृत्व आणि अर्थपूर्ण योगदानाद्वारे भारताच्या मोटरसायकलिंग संस्कृतीला आकार देणाऱ्या व्यक्ती आणि समुदायांचा गौरव करण्यात आला.

देशभरातील रायडर्स, समुदाय नेते आणि मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित हा सोहळा रायडर-नेतृत्वातील आणि तळागाळातील योगदानकर्त्यांसाठी समर्पित भारतातील पहिल्या मोठ्या सन्मान मंचांपैकी एक ठरला.

अभिनेता आणि सूत्रसंचालक अमन यतन वर्मा यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कथाकथन आणि उत्सव यांचा सुंदर संगम साधत, प्रसिद्धीपासून दूर राहून सातत्याने योगदान देणाऱ्या रायडर्सचा येथे गौरव करण्यात आला.

विंगमॅनएक्सचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश साने यांनी या उपक्रमामागील दृष्टीकोन स्पष्ट करताना सांगितले, "रायडर्सना अर्थपूर्ण पद्धतीने एकत्र जोडणे आणि जबाबदारीने रायड करण्यासाठी प्रेरित करणे, या उद्देशाने हे व्यासपीठ उभारण्यात आले. विश्वासावर आधारित योग्य रायडिंग साथीदार शोधण्याच्या साध्या कल्पनेतून सुरू झालेला हा प्रवास आज राष्ट्रीय स्तरावरील रायडर इकोसिस्टम बनला आहे, जिथे ओळख, विश्वास आणि प्रतिष्ठेला महत्त्व आहे. हे पुरस्कार सातत्याने उच्च मानके प्रस्थापित करणाऱ्या रायडर्स आणि समुदायांचा सन्मान करतात."



२०२४ मध्ये सुरू झाल्यापासून विंगमॅनएक्सने ८०,००० पेक्षा अधिक ॲप डाउनलोड्स आणि ६०० हून अधिक रायडिंग क्लब्स जोडत विश्वासार्ह डिजिटल व्यासपीठ म्हणून आपली ओळख अधिक मजबूत केली आहे.

सह-संस्थापक डॉ. साहिल त्रिंबके यांनी रायडिंग संस्कृती घडवण्यात समुदायाच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. "मजबूत गट चांगल्या सवयी निर्माण करतात, सुरक्षिततेला प्राधान्य देतात आणि रायडर्समध्ये जबाबदारीची भावना वाढवतात. हे पुरस्कार या सामूहिक जबाबदारीचा उत्सव आहेत," असे ते म्हणाले.

पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी पुरस्कारांचे मूल्यांकन एका सुसूत्र पद्धतीद्वारे करण्यात आले. प्रथम नामांकनांची छाननी निवड समितीने केली, त्यानंतर सार्वजनिक मतदान आणि स्वतंत्र परीक्षक मंडळाकडून मूल्यमापन झाले. अंतिम विजेते ५०:५० गुणांकन पद्धतीद्वारे ठरवण्यात आले, ज्यात समुदाय सहभाग आणि तज्ज्ञ मूल्यांकन यांना समान महत्त्व देण्यात आले.

विंगमॅनएक्सच्या भागीदार उर्वशी पाटोले यांनी सांगितले की या पुरस्कारांचा उद्देश खऱ्या अर्थाने पात्र व्यक्तींनाच सन्मान देण्याचा आहे. "सातत्य, जबाबदारी आणि योगदान यावरच आमचे लक्ष राहिले आहे. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता परिसंस्था मजबूत करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांचा गौरव करणे हाच आमचा हेतू आहे," त्या म्हणाल्या.

हा पुरस्कार सोहळा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. अनिल वालिव - बोरिवली प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई यांचे प्रमुख आणि भारतीय लष्कराचे माजी अधिकारी कर्नल अरुण दत्ताजी पाटोले (निवृत्त) यांच्या उपस्थितीत पार पडला. यासोबतच मोटरसायकलिंग समुदायातील मान्यवर नेत्यांची परीक्षक समितीही उपस्थित होती.

डीएसजी, १०० केएमपीएच, व्रेडेस्टाइन टायर्स, ब्लूआर्मर कम्युनिकेशन आणि अशोक ट्रॅव्हल वर्ल्ड या इकोसिस्टम भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेले हे पुरस्कार भविष्यात दरवर्षी आयोजित करण्याचे नियोजन आहे.

विंगमॅनएक्स ट्रॉफी ही केवळ एक पुरस्कार नाही ती धैर्य, शिस्त आणि समुदायभावनेतून घडलेल्या रायडरच्या प्रवासाला अर्पण केलेली एक शिल्पात्मक आदरांजली आहे. मध्यभागी असलेले हेल्मेट सुरक्षितता, ओळख आणि तग धरण्याच्या शक्तीचे प्रतीक आहे; तर पंख स्वातंत्र्य आणि बंधुभाव दर्शवतात. परस्पर जोडलेली गिअर्स अचूकता आणि सातत्यपूर्ण प्रगतीचा गौरव करतात. तिचा सुवर्ण रंग मिळवलेल्या वारशाचे प्रतिनिधित्व करतो, आणि काळा पाया सामर्थ्य व नम्रतेचे प्रतीक आहे. एका जीवनपद्धतीचा उत्सव साजरा करणारी ही ट्रॉफी आहे.

### पुरस्कार विजेते (क्लब श्रेणी)

- आरई६५० ओनर्स ग्रुप – क्लब ऑफ द इयर अवॉर्ड
- थ्रॉटल ट्रेकर्स बाइकिंग कम्युनिटी – सोल क्लब अवॉर्ड
- बाइकर बेब्स – वुमन पॉवर कलेक्टिव अवॉर्ड
- दा पुणे व्हीस्ट्रॉम क्रू – सेफ्टी-फर्स्ट क्लब अवॉर्ड
- महू रायडर्स क्लब – मोस्ट ॲक्टिव रायडिंग क्लब अवॉर्ड
- डेटूर इंडिया – बेस्ट क्लब इव्हेंट ऑफ द इयर अवॉर्ड

### पुरस्कार विजेते (वैयक्तिक श्रेणी)

- श्रेयश वाघ – द अल्टिमेट विंगमॅन अवॉर्ड
- हरदीप सिंग – मेंटर ऑफ द इयर अवॉर्ड
- सामी सैयद – नोमॅडिक सोल अवॉर्ड
- बलजीत सिंग कोछर – लॉंग हॉल लेजेंड्स अवॉर्ड
- साहन सिंग कोछर – रायझिंग स्टार अवॉर्ड
- बॅनी राययानी – राइड आर्किटेक्ट अवॉर्ड
- ज्योतिप्रकाश डेका – सोल रायडर अवॉर्ड
- रजत गावरले – गार्डियन रायडर अवॉर्ड
- डॉ. मोहनराज शंकर – पिलर ऑफ द कम्युनिटी अवॉर्ड
- मोहुआ पॉली – शी राइड्स फ्री अवॉर्ड
- शताब्दी सामंता – ट्रॅक टायटन अवॉर्ड
- हृषिकेश श्रीकांत मांडे – स्टंट ऐस अवॉर्ड
- कपिल जैन – कम्युनिटी क्रिएटर अवॉर्ड
- प्रियंका बरुआ – डिजिटल पल्स अवॉर्ड

## जनता वसाहत : ड्रेनेज समस्येबाबत पुणे महानगरपालिकेत आवाज

**पुणे-प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

जनता वसाहत परिसरात ड्रेनेज लाईन वारंवार तुंबत असल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येऊन परिसरात घाण, दुर्गंधी व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः माता-भगिनी आणि लहान मुलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक सुरज लोखंडे आणि नगरसेविका प्रिया गदादे यांनी पुणे महानगरपालिकेकडे या समस्येबाबत आवाज उठवला आहे. जय भवानी परिसरातील ८ व जनता वसाहत गल्ली क्रमांक १ ते १०८ या गल्ल्यांसाठी सध्या केवळ तीन ड्रेनेज आउटलेट उपलब्ध आहेत. जनता चौक, आझाद मंडळ भाजी मंडई आणि शंकर मंदिर येथे असलेली ही आउटलेट्स इतक्या मोठ्या परिसरासाठी अपुरी ठरत आहेत.



परिणामी सांडपाणी योग्यरीत्या वाहत नसून वारंवार तुंबण्याची समस्या निर्माण होत आहे. या संदर्भात पुणे महानगरपालिकेकडे ड्रेनेज लाईनची तात्काळ साफसफाई करावी, आवश्यक त्या ठिकाणी नवीन ड्रेनेज आउटलेट वाढवावेत, रस्त्यावर साचणारे सांडपाणी थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि आरोग्याच्या दृष्टीने नियमित तपासणी व देखभाल करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## मॉरिशसमध्ये होणार मराठी अस्मितेचा जागतिक जयघोष

### आंतरराष्ट्रीय सांगीतिक-सांस्कृतिक सोहळा "मोगरा फुलला" – अभिमानाचा उत्सव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगभरातील मराठी भाषिकांकडून दरवर्षी मराठी भाषा दिन अभिमानाने साजरा केला जातो. केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हा अभिमान अधिकच वृद्धिंगत झाला आहे. या ऐतिहासिक गौरवाचा विस्तार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याच्या उद्देशाने मॉरिशस येथे २७ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२६ या कालावधीत "मोगरा फुलला" या भव्य आंतरराष्ट्रीय सांगीतिक व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मॉरिशसमधील प्रतिष्ठित सर्ज कॉन्स्टँटिन थिएटर येथे पार पडणार असून, याबाबतची माहिती स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाउंडेशन चे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रबोधन परिवाराच्या सन्मिता धापटे-शिंदे, गणेश शिंदे, फाउंडेशनचे सचिव प्रसादराजे भोपळे आदि मान्यवर उपस्थित होते. हा सोहळा स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाउंडेशन आणि प्रबोधन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय व मॉरिशस कला व सांस्कृतिक मंत्रालय यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. यासोबतच मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्ट, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन, मॉरिशस मराठी स्पीकिंग युनियन आणि क्रॉसवेज इंटरनॅशनल यांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे. यंदाचे वर्ष संतपरंपरेचे अध्वर्यू संत ज्ञानेश्वर यांच्या ७५० व्या जयंती वर्षाचे आहे. त्या औचित्याने हा संपूर्ण सोहळा त्यांच्या जीवनकार्य, तत्त्वज्ञान आणि मानवतावादी विचारांवर आधारित आहे. मराठी भाषा, अध्यात्म आणि संस्कृती यांचा संगम साधणारा हा उपक्रम जागतिक मराठी उत्सव म्हणून साकारत आहे.




"मोगरा फुलला" हा कार्यक्रम गणेश शिंदे आणि सन्मिता धापटे-शिंदे तर शुभांगी शिंदे 'मी महाराष्ट्र बोलतोय' यावर स्वगत सादर करणार आहेत. असे कांबळे यांनी सांगितले. या कार्यक्रमाला मॉरिशस प्रजासत्ताकाचे उपराष्ट्रपती जीन रॉबर्ट इवान हंगली, कला व सांस्कृतिक कार्य मंत्री महेंद्र गोंदिया तसेच महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मॉरिशसमध्ये वास्तव्यास असलेल्या मोठ्या मराठी डायस्पोरा समुदायाला मातृभूमीतील आध्यात्मिक, साहित्यिक व सांस्कृतिक वारशाशी पुन्हा जोडणारे प्रभावी व्यासपीठ म्हणून "मोगरा फुलला"कडे पाहिले जात आहे. प्रबोधन परिवाराच्या सन्मिता धापटे-शिंदे म्हणाल्या, "'मोगरा फुलला' हा केवळ सांगीतिक कार्यक्रम नसून मराठी अस्मिता, अध्यात्म आणि सांस्कृतिक वारशाचा जागतिक उत्सव आहे.

मॉरिशसच्या भूमीवर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सुगंध दरवळविणारा हा उपक्रम दोन्ही देशांतील सांस्कृतिक बंध अधिक घट्ट करेल." प्रसादराजे भोपळे यांनी सांगितले की, "'मोगरा फुलला'चा हा पहिला आंतरराष्ट्रीय प्रयोग मॉरिशसमध्ये होत असून, पुढील टप्प्यात पॅरिस (फ्रान्स) येथेही हा उपक्रम नेण्याचा आमचा मानस आहे."

# 'फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया २०२५-२६'चा समारोप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताने विद्यार्थी रोबोटिक्स आणि एसटीईएम नवोन्मेषात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. नुकतेच विश्वकर्मा विद्यापीठाने सादर केलेल्या एसजीटी युनिव्हर्सिटी, गुरुग्राम येथे आयोजित भव्य राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेने 'फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया २०२५-२६'चा समारोप झाला. या स्पर्धेत भारतातील आंतरराष्ट्रीय सहभागींसह शीर्ष रोबोटिक्स संघांना एकत्र आणले, ज्यांनी अभियांत्रिकी उत्कृष्टता, नवोन्मेष आणि सहयोगी समस्या सोडवण्याचे प्रदर्शन एका राष्ट्रीय व्यासपीठावर केले.

या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार प्रो. अजय कुमार सूद, एसजीटी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. हेमंत वर्मा, सायबर मीडिया ग्रुपचे अध्यक्ष प्रदीप गुप्ता, संत ईश्वर फाउंडेशनच्या भारती खन्ना, इन्फिनिटी एक्स स्टेम फाउंडेशनचे अध्यक्ष अश्विन बी. सावंत व फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया प्रोग्रामचे डिलिव्हरी पार्टनर इन्फिनिटी एक्सचे संचालक मोहम्मद अतेक मोहिउद्दिंग सिद्दकी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.




फर्स्ट (विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रेरणा आणि ओळखीसाठी) ही एक जागतिक ना-नफा तत्वावर चालणारी संस्था आहे, जी तरुणांना अभियांत्रिकी, नवोन्मेष आणि नेतृत्व कौशल्ये निर्माण करणाऱ्या मार्गदर्शक-आधारित कार्यक्रमांद्वारे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे नेते बनण्यास प्रेरित करण्यासाठी समर्पित आहे. फर्स्ट टेक चॅलेंज (एफटीसी) हा १२ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रमुख जागतिक रोबोटिक्स कार्यक्रम आहे, जिथे संघ औद्योगिक-शैलीतील रोबोट डिझाइन, बांधणी आणि प्रोग्राम करतात आणि संरचित स्पर्धा स्वरूपात स्पर्धा करतात,जे नवोन्मेष, टीमवर्क आणि दयाळू व्यावसायिकतेला प्रोत्साहन देते. तसेच

फर्स्ट टेक चॅलेंज इंडिया हे एफटीसी कार्यक्रमाचे अधिकृत राष्ट्रीय वितरण व्यासपीठ म्हणून काम करते, ज्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष STEM अनुभव मिळविण्यास आणि जागतिक स्पर्धात्मक संधींमध्ये प्रवेश करण्यास सक्षम करते.

२०२५-२६ एफटीसी इंडिया हंगामात राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी देशभरात अनेक प्रादेशिक पात्रता स्पर्धा आयोजित करून ऐतिहासिक कामगिरी केली.

उत्तर भारत प्रादेशिक पात्रता स्पर्धा गुरुग्राम येथील एसजीटी विद्यापीठात (१७ व १८ जानेवारी २०२६) आयोजित करण्यात आली होती, त्यात १५ हून अधिक संघांनी सहभाग घेतला होता. पश्चिम भारत प्रादेशिक पात्रता स्पर्धा मुंबईतील नीता मुकेश अंबानी ज्युनियर स्कूल (२५-२६ जानेवारी २०२६) येथे संपन्न झाली, त्यामध्ये २५ हून अधिक संघांनी सहभाग घेतला होता.

उर्वरित भारत प्रादेशिक पात्रता स्पर्धा गुरुग्राम येथील एसजीटी विद्यापीठात (५-६ फेब्रुवारी २०२६) आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये देशभरातील २० हून अधिक संघांनी सहभाग घेतला होता आणि खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पात्रता सर्किट पूर्ण केले होते.

या पात्रता फेरीचा शेवट गुरुग्राम येथील एसजीटी विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत झाला, ज्यामध्ये ५० हून अधिक संघांनी भाग घेतला. तसेच त्यात युएई आणि श्रीलंकेतील आंतरराष्ट्रीय संघांचा समावेश होता.


दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.